# गुंतवणूकदारां च्या अधिकारांचे विधान

वित्तीय सेवा प्रदात्याकडून अपेक्षित सेवा देणाऱ्या आचारसंहितांच्या वित्तीय सेवा, उत्पादनांच्या खरेदीदारांना सल्ला देण्यासाठी CFA Institue ने गुंतवणूकदार अधिकारांचे विधान विकसित केले. हे अधिकार कोणत्याही मूलभूत नातेसंबंधावर विश्वास व भरोसा प्राप्त करण्यासाठी, महत्वपूर्ण मूलभूत नैतिक तत्वे दर्शवतात. ही यादी आर्थिक उत्पादने आणि सेवा, जसे कि, गुंतवणूक व्यवस्थापन, संशोधन आणि सल्ला, वैयक्तिक बँकिंग, विमा आणि रिअल इस्टेट (जमीन ), वर लागू होते. जर आपण गुंतवणूक नियोजन करत आहात, ब्रोकर बरोबर काम करत आहात, बँक खाते उघडत आहात किंवा घर खरेदी करत आहात, तर आपल्याला आवश्यक असलेली माहिती आणि योग्य सेवा घेण्यास हे अधिकार मदत करतात.

**वित्तीय अधिकाऱ्यांनी या अधिकारांचे पालन केले पाहिजे अशी मागणी करावी. असं केल्याने, त्या व्यक्तीत आणि / किंवा आपण गुंतवलेल्या योजनेत (फर्म मध्ये) विश्वास धृढ करण्यास मदत होईल. प्रत्येक ग्राहकाने / गुंतवणूकदाराने ह्या अधिकारांची अंमलबजावणी केल्यास अर्थव्यवसस्था मजबूत होण्यास होईल.**

## वित्तीय व्यावसायिक आणि संस्थांची सेवा घेताना मला खालील अधिकार आहेत...

1. **प्रामाणिक**, सक्षम आणि नैतिक आचरण, जे लागू कायद्याचे पालन करतात;

2. **सूचित विश्लेषण**, विवेकपूर्ण निर्णय आणि परिश्रम पूर्वक केलेल्या प्रयत्नांनुसार स्वतंत्र आणि वस्तुनिष्ठ सल्ला आणि साहाय्य;

3. माझ्या आर्थिक **हिताला** सेवा देण्याऱ्या व्यक्ती आणि संस्थे पेक्षा अधिक प्राधान्य;

4. मला आणि इतर ग्राहकांना **समान** वागणूक;

5. माझ्यासाठी सेवा किंवा उत्पादने प्रदान करण्यातील हितांमध्ये **संभाव्य विवाद** उघड करणे;

6. माझ्या सर्व परिस्थिती **समजून** घेणे, जेणेकरून मला दिलेला कोणताही सल्ला माझ्या आर्थिक उद्दिष्टांवर आणि निर्बंधांवर आधारित असेल;

7. **साधी भाषा** वापरणे, स्पष्ट, अचूक, पूर्ण आणि वेळेवर माहिती देणे, व ही माहिती प्रभावितपणे सूचित होईल अशा प्रकारे सादर करणे;

8. माझ्याकडून आकारण्यात आलेल्या **शुल्काचे** आणि खर्चाचे स्पष्टीकरण आणि या खर्चास दर्शवणारी न्याय्य व वाजवी माहिती देणे;

9. माझ्या वैयक्तिक माहितीची **गुप्तता** ठेवणे;

10. माझ्या साठी केलेल्या कामाचे समर्थन करण्यासाठी योग्य आणि **संपूर्ण नोंद / पुरावा ठेवणे**.

**cfainstitute.org/futurefinance वर जा**

© 2019 CFA Institute. All rights reserved.